MHRG120004912024

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२४/२०२४</u>

**अलका बाळासाहेब भिंगारे वगैरे १**
**वि.**
**तारामती हरिश्चंद्र राजापुरकर वगैरे १**

**<u>निशाणी क्र.२१ कडील आदेश</u>**

प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करावा म्हणून व त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१ ही वयस्कर असून सतत आजारी असते त्यामुळे तिला सतत दवाखान्यात जावे लागत असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र.२ हा कामानिमित्त बाहेर गेला असल्यामुळे व महत्वाची कागदपत्र वेळेत न मिळाल्याने त्यांना मुदतीत कैफीयत देणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादीचा बचाव न्यायालयासमोर येण्यासाठी त्यांचे विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होणे आवश्यक असल्याने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची प्रतिवादीने मागणी केली आहे.

२. वादींतर्फे सदर अर्जावर सक्त हरकत असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. त्यांचे कथन असे आहे की, प्रतिवादींना दाव्याच्या समन्स व नोटीसच्या कॉपी मिळून सुध्दा त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केले नाही व मुद्दाम विलंब केला आहे. झालेल्या विलंबाबात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. करिता प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी हजर झाल्यानंतर त्यांनी मुदतीत कैफियत दाखल न केल्याने त्यांचे विरूध्द दिनांक

१०.०४.२०२५ रोजी विना कैफियत आदेश पारित करण्यात आला आहे. प्रस्तुतचा दावा वादींनी अतिक्रमण दूर करुन मिळणेकरिता व निरंतरचे मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. अभिलेखानूसार अद्याप दाव्याची सुनावणी सुरू झालेली नाही. दाव्यात दोन्ही पक्षकारांचे अचल मालमत्तेसंबंधी अधिकार गुंतलेले आहेत. अशा परिस्थीतीत दाव्याचा निकाल गुण–अवगुणावर लागण्यासाठी व प्रकरणांची बहुल्यता टाळण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक असल्याने झालेला विलंब माफ करुन विना म्हणणे व विना कैफियत आदेश रद्द करुन लेखी म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे न्यायाचे होईल या मतास मी पोहचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांनी वादींना ७००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी २१ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादीस रू.७००/–(रक्कम रुपये सातशे मात्र) खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे व प्रतिवादीं विरुध्द झालेला विना म्हणणे व विना कैफियत आदेश रद्द करुन लेखी म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

स्वाक्षरी/–

( घन:शाम रा.तिवारी )

दिनांक : ३०–१०–२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड